# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. विशेष स्थायी समिती सभा दि. २५/०४/२०१७

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक २५/०४/२०१७ रोजी सभा सुचना क्र. ०२ दि. २१/०४/२०१७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात दु. १२.३० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. प्रभाकर म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे | मा. सभापती |
| २. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | सदस्य |
| ३. | श्री. शरद केशव पाटील | सदस्य |
| ४. | श्री. वेंचर गिल्बर्ट मेन्डोसा | सदस्य |
| ५. | श्रीम. डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६. | श्रीम. बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ७. | श्री. राकेश रतिशचंद्र शहा | सदस्य |
| ८. | श्री. यशवंत ठकाजी कांगणे | सदस्य |
| ९. | श्रीम. वर्षा गिरीधर भानुशाली | सदस्या |
| १०. | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ११. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्या |
| १२. | श्री. राजू यशवंत भोईर | सदस्य |
| १३. | श्रीम. असेन्ला मेन्डोंसा परेरा | सदस्या |

गैरहजर सदस्य– निरंक

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| २. | श्रीम. झिन्नत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ३. | श्रीम. दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |

मा. सभापती :-

सर्व सदस्यांना नमस्कार. सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

प्र. नगरसचिव :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा मंगळवार दि. २५/०४/२०१७ रोजी दुपारी १२.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०२ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. १२, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नविन जलजोडणी मंजूरीसाठी संगणक आज्ञावली विकसित करुन कार्यान्वित करणेकामी संस्थेची नेमणूक करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड मधील प्रकरण ५(२)(२) अन्वये मान्यता देणेबाबत.

मर्लिन डिसा :-

मा. सभापती साहेब ह्या विषयाची सविस्तर माहिती द्या.

सुरेश वाकोडे :-

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो, ऑनलाईन कनेक्शनचा विषय आपण स्थायी समितीमध्ये ठेवला आहे. आपल्याकडे ॲडिशनल ७५ एम.एल.डी. चे जे काम चालू आहे त्यासाठी २५ एम.एल.डी. पाणी तातडीने उचलण्यासाठी एरिगेशन डिपार्टमेंटकडे मिटींग झाली. त्या मिटींगमध्ये ठरले त्यांनी आपल्याला मंजूरी दिली. त्याप्रमाणे एरिगेशन डिपार्टमेंटने एम.आय.डी.सी. ला २५ एम.एल.डी पाणी तातडीने मिरा भाईंदरला चालू करावे अशा सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने २५ एम.एल.डी. पाणी शहरात येते. थोडे थोडे घेणे आपण चालू केले आहे. कालच आपण १८ एम.एल.डी. पाणी घेतले. आता सध्या नविन सिस्टीमला जोडायचे आहे. आपल्या लाईनमध्ये प्रेशर वाढवण्यासठी क्रॉस कनेक्शन करावे लागते त्यासाठी काय केले ८-९ कामे हाती घेतली होती. तो शटडाऊन ३६ तासावर गेला. आपला सप्लाय ४८ ते ३६ जर काही सप्लाय वाढला गोडदेव भागामध्ये नंतर व्हॉल्व बंद पडला होता तो आणखी सप्लाय पुढे ७-८ तास वाढले. त्यामुळे ते ९० तासावर गेले. हा त्रास झाला तो सिस्टीमचा पार्ट आहे. हे करणे गरजेचे म्हणून आपण ते काम हाती घेतले पण आता ॲडीशनल पाणी सुरु झाले. त्यासाठी कनेक्शन देण्यासाठी एक सिस्टीम असली पाहिजे. सिस्टीममध्ये

पारदर्शकता असली पाहिजे. त्यासाठी आपण ऑनलाईन सिस्टीममध्ये आणले आहे. लोकांना टेबला टेबलावर जायची गरज नाही. आपण जो फॉर्म भरला तो कोणाकडे गेला ते समजले पाहिजे. माझा फॉर्म पुढे पाठवला की नाही त्याचा कम्प्युटरवर मेल ॲड्रेस जाईल. तुमचा फॉर्म हा मिस्त्रीकडे गेला आहे. मिस्त्रीने त्याच्यावर साईट व्हिजीट करुन त्याच्यावर रिमार्क देऊन पुढे गेलेला आहे. त्याच्यात काही साईट रिमार्क असतील तर तो परत आलेला आहे. क्वेरी असेल तर त्यांना लगेच कळेल. क्वेरी नसेल तर फॉर्म पुढे गेला आहे.

वेंचर मेन्डोंसा :-

त्याच्यासाठी पेपर काय लागतील. कारण नविन जी ऑनलाईन जोडणी करता. जे जुने बिल्डींग बनवले आहेत त्या लोकांकडे सी.सी., ओ.सी. नाही. त्या लोकांसाठी काय करणार ते सांगा.

सुरेश वाकोडे :-

ज्या २००० पूर्वीच्या बिल्डींग आहेत त्यांना सी.सी., ओ.सी. नसली तरी चालेल. जुन्या बिल्डींग आहेत त्यांना कनेक्शन मिळेल. आपला नियम १९९५ पूर्वीचा आहे. पण नंतर गर्व्हमेंटनी १९९५ पूर्वीचा नियम...........

शरद पाटील :-

आपण कसे करणार जी.आर. प्रमाणे करणार की आपल्याप्रमाणे करणार.

सुरेश वाकोडे :-

आपण जी.आर. प्रमाणे जाऊ जी.आर मध्ये जे मॉडिफिकेशन आहे.

वर्षा भानुशाली :-

जी.आर. प्रमाणे ९५ चे आहे.

सुरेश वाकोडे :-

आमच्याप्रमाणे ९५ आहे ह्यांच्याप्रमाणे २००० आहे मॉडिफिकेशनसाठी महासभेत यावे लागणार.

शरद पाटील :-

वाकोडे साहेब आम्ही आपल्याला विचारतो आपण जबाबदार व्यक्ती आहात तुम्ही जी.आर. प्रमाणे करणार की शासनाची जी मूबलक सूट दिली आहे त्याप्रमाणे करणार. त्याचे आम्हाला नक्की उत्तर द्या. आम्ही लोकांना सांगितले की २००० वाल्यांना काय पेपर लागणार नाहीत जे आहे ते तुम्हाला मिळतील. आणि तुम्ही सांगाल ९५ पूर्वीचे मग ते होणार नाही त्यामुळे आता नक्की करा. तुम्ही कुठल्या कनेक्शनला पहिले प्राधान्य देणार ते सांगा.

सुरेश वाकोडे :-

प्राधान्याचा क्रम म्हटला तर नियमाप्रमाणे ज्या बिल्डींगची ओ.सी., सी.सी. आहे ज्याला प्रॉपर्टी टॅक्स लागला आहे. त्या बिल्डींगला पहिला प्रेफरन्स जातो. महासभेने आणि स्टॅन्डिंगने केलेला ठराव ९५ चा आहे. आता गर्व्हमेंटचे २००० चे आलेले आहेत. आम्हाला ह्याच्यामध्ये मॉडिफिकेशनसाठी महासभेत जावे लागणार आहे.

वर्षा भानुशाली :-

९५ साठी काही डॉक्युमेंटची गरज नाही ना. सी.सी, ओ.सी. ची गरज नाही.

सुरेश वाकोडे :-

९५ साठी तुम्हाला टॅक्स पुरावा लागेल. यापूर्वीचे जे कनेक्शन बंद केले होते त्यावेळची जी नियमावली होती ते ९५ चे स्ट्रक्चर असेल ते. त्यावेळी सी.सी., ओ.सी. त्या स्ट्रक्चरला लागत नव्हत. त्याला अगोदरचे स्ट्रक्चर आहे.

प्रेमनाथ पाटील :-

टॅक्समध्ये याचा रिमार्क मारुन घ्या. यांची ९५ पूर्वी कर आकारणी झाली होती.

शरद पाटील :-

तुमच्या पध्दतीने २००० पर्यंतच्याच घ्यायच्या. तुम्ही सांगाल तस. तुम्ही बोलू नका २००० पर्यंत देणार म्हणून. एकदा सांगा २००० पर्यंत द्याल म्हणून.

सुरेश वाकोडे :-

२००० पर्यंत देण्यासाठी मला महासभेत यावे लागेल.

शरद पाटील :-

आताची माहिती द्या.

सुरेश वाकोडे :-

ज्या बिल्डींगला सी.सी., ओ.सी. आहे.......

प्रेमनाथ पाटील :-

तो विषय वेगळा होता.

सुरेश वाकोडे :-

९५ पूर्वीच्या ज्या जुन्या बिल्डींग आहेत त्यांना प्रॉपर्टी टॅक्स लागला आहे. त्या बिल्डींगला कनेक्शन कमी असेल तर त्यांना आम्ही देऊ. ह्याच्यापुढे मॉडिफिकेशन असतील तर महासभेत येणार.

प्रेमनाथ पाटील :-

आता ९५ पकडून चाला. दुसरा विषय असा आहे.

शरद पाटील :-

आता ऑनलाईन फॉर्म भरायला घेतल्यानंतर किती दिवसात लोकांना कनेक्शन द्यायला सुरुवात करणार.

प्रेमनाथ पाटील :-

कंपनी बसणार की आपली लोक ऑनलाईन बसणार आहेत. कस काय करणार आहेत?

सुरेश वाकोडे :-

ऑनलाईन सिस्टीमसाठी आम्ही काय केले की, अगोदर आपण हेड ऑफिसला फॉर्म द्यायचो. हेड ऑफिसला फॉर्म घेतले की लोकांची गर्दी वाढते. लोकांची असुविधा होते. त्यासाठी आपण प्रत्येक प्रभाग समितीला फॉर्म देणार आहोत. प्रत्येक प्रभाग समितीमध्ये आमचे ६ लोक बसवणार. ०३ कम्प्युटर असणार. त्या कम्प्युटरवरती आम्ही फॉर्म स्विकारणार. ही सिस्टीम ऑनलाईन आहे. त्या सिस्टममध्ये फॉर्म वेगळा निघत नाही. कम्प्युटरवर घरी बसून ऑनलाईन फॉर्म भरुन पाठवू शकता. तसे त्याच्यात कोणी फॉर्म भरण्यासाठी तज्ञ नसेल त्यासाठी प्रभाग समितीत ०३ कम्प्युटर असणार ऑपरेटर असणार. आपले तिथे फॉर्म भरता येईल. त्यांनी फक्त डॉक्युमेंट सोबत घेऊन यायचे.

प्रेमनाथ पाटील :-

ज्यांचे डॉक्युमेंट अपुरे असतील त्यांना पहिलेच सांगा तुमचा फॉर्म फील अप केला जाणार नाही.

सुरेश वाकोडे :-

आपली काय इच्छा आहे. लोकांनी जास्त वेळ लाईनमध्ये उभे राहू नये.

वर्षा भानुशाली :-

एक वेळ चालू केल तर तिथे तुमची लोक असायला पाहिजे. टॅक्स सारख नसायला पाहिजे.

सुरेश वाकोडे :-

आपण लोक जास्त ठेवतो. ३ ठेवणे गरजेचे आहे पण आपण ५ ठेवतो. एखादा कमी असला तर आपण ॲडजस्ट करतो.

राकेश शहा :-

साहब इसका निविदा निकालने के बाद में सॉफ्टवेयर कंपनी सॉफ्टवेयर कब तक देगी। उसके पास रेडी पडा है क्या?

सुरेश वाकोडे :-

आपण नेमणूक केलेली कंपनी आहे. ती ठाणे महानगरपालिकेमध्ये दोन वर्षापासून ऑनलाईन कनेक्शन सुरु आहे. त्याच्यात दोन्ही गोष्टी सुरु आहेत ऑनलाईन, ऑफलाईन. ऑनलाईनमध्ये ते फॉर्म भरतात आणि त्याचे प्रिंट मारुन ऑफलाईनमध्ये ती फाईल ठेवतात. दोन वर्षापासून सक्सेसफूली चालू आहे.

राकेश शहा :-

निविदा निकालने के बाद सॉफ्टवेयर अपने हाथ में कब आएगा।

सुरेश वाकोडे :-

२-३ दिवस लागतील. ३० तारखेच्या अगोदर आपल्याकडे येणार.

हरिश्चंद्र आमगावकर :-

ज्या ठिकाणी चाळ सिस्टम आहे, गावठण आहेत, छोटी छोटी घरे आहेत त्यांना कनेक्शन घ्यायचे असेल त्याच्यासाठी काय प्रोव्हिजन आहे.

सुरेश वाकोडे :-

झोपडपट्टी असेल त्यांना टॅक्स लागलेला असेल ९५ पूर्वीचे असेल त्यांना ५ लोकांना ग्रुपमध्ये कनेक्शन देऊ.

हरिश्चंद्र आमगावकर :-

स्वतःला घरात घ्यायचे असेल.

सुरेश वाकोडे :-

गावठण भाग असेल आणि ९५ पूर्वीचा असेल तर त्यांना कनेक्शन देता येईल.

शरद पाटील :-

आपल्याकडे ऑनलाईन सॉफ्टवेयरची माहिती असलेली लोक किती आहेत.

सुरेश वाकोडे :-

सॉफ्टवेयर नवीन आहे अजून. दोन दिवसांनी माझ्याकडे येणार आहे.

शरद पाटील :-

मला तेच बोलायचे आहे की आपल्याकडे सॉफ्टवेयरची माहिती असलेली माणसे नाहीत. तज्ञ नाहीत तर मग हे कनेक्शन किती महिन्यानंतर चालू करणार. ट्रेनिंग किती दिवसात देणार आहेत. पारदर्शकपणा जो ऑनलाईनमध्ये आहे तो झालाच पाहिजे. आम्ही ह्या मताचे आहोत. पण तुम्ही किती दिवसात ट्रेनिंग द्याल.

आम्हाला हजारो कनेक्शन द्यायचे आहेत. जर आपल्याकडे लोक नसली तर आपण काय करणार? नागरिकांना काय उत्तर देणार.

मर्लिन डिसा :-

एक ठराविक नंबर आहे का? किती लोकांना देऊ शकतो. लिमीट असायला पाहिजे.

प्रेमनाथ पाटील :-

आज माझा ऑनलाईन फॉर्म फिलअप झाला तर मला किती दिवसांनी नळ कनेक्शन मिळेल.

सुरेश वाकोडे :-

ऑनलाईनमध्ये जी प्रोसिजर आहे तुमचा फॉर्म क्लर्ककडे जातो. तो फॉर्म व्हेरीफाय करतो. तो ओके करुन तो लगेच मिस्त्रीकडे पाठवतो, मिस्त्री साईटवर जाऊन व्हिजीट करणार तिथे कोणती लाईन आहे, खालची टाकी आहे की नाही वरची टाकी आहे की नाही त्या सगळ्या गोष्टी नमूद करुन तो कम्प्युटरवर डाटा फिड करणार. त्यानंतर तो फॉर्म जे.ई.कडे जाणार त्यानंतर जे.ई. त्याला व्हेरीफाय करणार. मिस्त्रीने दिलेली माहिती बरोबर आहे का? ते झाल्यावर ती फाईल प्रॉपर्टी टॅक्स डिपार्टमेंटकडे जाणार. प्रॉपर्टी टॅक्सच्या हेडकडे फाईल जाणार. ते आपल्या कम्प्युटरमध्ये चेक करणार त्याचा प्रॉपर्टी टॅक्स नंबर बरोबर आहे की नाही ते व्हेरीफाय करुन क्लिअर करणार. प्रॉपर्टी टॅक्स क्लिअर झाल्यावर ती फाईल टाऊन प्लानिंगमध्ये जाणार. टाऊन प्लानिंग सी.सी, ओ.सी. नंबर बरोबर आहे का ते व्हेरीफाय करणार त्यानंतर ऑनलाईन यस करणार.

प्रेमनाथ पाटील :-

किती दिवस.

सुरेश वाकोडे :-

ह्या प्रोसीजरला ८ ते १५ दिवस लागणार. तुम्हाला घरी बसून समजणार की आपली फाईल जे.ई कडे किंवा टाऊन प्लानिंगमध्ये क्लिअर झाली आहे. स्वतः फॉलोअप करायची गरज नको म्हणून ही सिस्टीम.

मर्लिन डिसा :-

वाकोडे साहेब रेशीओ काय असणार? किती फ्लॅटला किती कनेक्शन हे सगळे चेक करणार की नाही.

सुरेश वाकोडे :-

तो क्रायटेरीया बदलत नाही. रिक्वायरमेंन्ट सेम असते. १५ फ्लॅटला एक कनेक्शन..........

मर्लिन डिसा :-

कोणी जास्त कनेक्शन मागितले तर देणार का?

सुरेश वाकोडे :-

नाही देणार.

मर्लिन डिसा :-

जुनी वसाहत आहे त्याची काळजी घेणार की नाही? ३०-४० वर्षापासून राहणारे आहेत. त्यांना फस्ट प्रेफरन्स.

सुरेश वाकोडे :-

देणार ना. कमी असले तर कनेक्शन देणार.

वेंचर मेन्डोंसा :-

वाकोडे साहेब आम्ही पहिल्यापासून लोकांना सांगितले आहे की तुम्हाला पाण्याचे कनेक्शन देऊ. तुम्ही बोलता आपल्याकडे २५ एम.एल.डी. पाणी आहे. माझे असे मत आहे ज्या जुन्या बिल्डींग आहेत. त्यांना पहिले पाणी देण्यात यावे. त्या लोकांना आम्ही आश्वासन दिले आहे. ज्या नविन बिल्डींग बनतात त्यांना नंतर कनेक्शन द्या. जे गावठण आहेत तसेच जे भाईंदरमध्ये ८० पासून राहायला आले.

सुरेश वाकोडे :-

९५ पूर्वीचे सर्वांना देणार.

वेंचर मेन्डोंसा :-

आज ज्या नविन बिल्डींग बनतात त्यांना नंतर कनेक्शन द्यावे. जे जुने लोक आहेत त्यांना द्या. त्यानंतर एक डेट फिक्स करा आणि मग नविन लोकांना द्या. मिरा भाईंदरचे जे रहिवासी आहेत त्यांना द्या. राई, मुर्धा, मोरवा, भाईंदर, उत्तन, पाली, चौक, गोडदेव.

शरद पाटील :-

साहेब तुम्ही ते कनेक्शन घेणारच आहेत. पहिले त्यांना द्या त्यानंतर चालू होईल असे होणार नाही. जेव्हा नविन कनेक्शन चालू होईल ते ओ.सी. आणि आपण लोकांना जी आश्वासन दिली आहेत ना ती पूर्ण करा.

मर्लिन डिसा :-

रस्त्याचे काम कॉंक्रीटायझेशन ओ.सी. नाही तेथे कॉंक्रीट रस्ते चालू आहेत. एका बाजूला रस्ते एका बाजूला कोणच नाही खाली जमीन तरी तिकडे रोड बनवले आहेत.

शरद पाटील :-

डेव्हलपमेंट चालूच आहे. कॉंक्रीटचे जे रस्ते होतात ते टी.डी.आर. मधून होतात. डीलर करतो.

सुरेश वाकोडे :-

आपण ज्या सुचना दिल्या त्या सगळ्या सुचनांचा विचार करुन आम्ही कनेक्शनची कारवाई करु.

वर्षा भानुशाली :-

तुम्ही ही जी सिस्टम चालू करणार आहेत. त्याला किती वेळ लागणार आहे आणि कोणत्या डेटपासून कनेक्शन चालू करणार. जी डेट असली त्याच्या ४ दिवस उशीरा बोला. तुम्ही ज्या डेटला सांगितले आहे त्या डेटला चालू करा. म्हणजे आम्हाला पब्लिकला सांगता येईल.

सुरेश वाकोडे :-

३० तारखेपासून सिस्टीम चालू होणार आहे.

वेंचर मेन्डोंसा :-

उत्तन सारख्या जागेवर जे नविन टॅक्स लागलेले आहेत आणि त्यांच्याकडे ओ.सी., सी.सी. नाही आहे.

शर्मिला बगाजी :-

आमची जी घरे आहेत त्यांना ओ.सी., सी.सी. नाहीत.

सुरेश वाकोडे :-

९५ पूर्वीची आहेत का?

शर्मिला बगाजी :-

९५ पूर्वीची आहेत आणि त्याच्या नंतरचे असतील ते.

वेंचर मेन्डोंसा :-

गावठणमध्ये लोकांनी परमिशन पण घेतली नाही. त्याच्याकडे कुठे आहे.

सुरेश वाकोडे :-

ज्या बिल्डींगला ओ.सी., सी.सी. आहे त्या बिल्डींगला होणार. जे गावठण भागात जी जूनी घर आहेत जी ९५ पूर्वीची घर आहेत त्यांना कनेक्शन देऊ. जे ९५ पूर्वीचे आहेत ज्यांनी अजिबात कनेक्शन घेतले नाही. त्यांना ताबडतोब कनेक्शन देऊ. ह्याच्यामध्ये काही बदल असेल तर मला महासभेत जावे लागेल.

शर्मिला बगाजी :-

ते बरोबर आहे पण तुम्ही नविन बिल्डींगना ओ.सी, सी.सी. देता आमच्याकडे परमिशन कुठे घेतात. आमच्याकडे लिगली परमिशन नसते. मग त्यांना काय करणार?

शरद पाटील :-

९५ पूर्वीचे आहेत त्यांना देणार असे सांगितले. तुम्हाला काय विचारायचे आहे.

शर्मिला बगाजी :-

२०१२ असे काहीतरी सांगा.

वेंचर मेन्डोंसा :-

एक घर आहे आणि ४ भावंड आहेत. फॅमिली वाढली त्यामुळे दुसरे घर शेतामध्ये बांधले.

प्रेमनाथ पाटील :-

हे घर गावठणमध्ये आहे का?

शर्मिला बगाजी :-

हो पण ते ९५ पूर्वीचे बोलतात.

सुरेश वाकोडे :-

नियमामध्ये काय बदल करायचा असेल तर आपण महासभेत प्रस्ताव आणून करुन घेऊ.

शरद पाटील :-

इथे तुम्ही करु शकत नाही. आपल्याला जे उत्तर द्यायचे ते दिलेले आहे. हा विषय महासभेपुढेच जाणार. शर्मिला बगाजी :-

ते अधिकार महासभेलाच आहेत ना. आपण कुठे त्याचा निर्णय घेणार आहोत.

राकेश शहा :-

मिरा-भाईदर शहराची लोकसंख्या सन २०११ च्या जनगणनेनुसार ८.१४ लक्ष इतकी असून सध्याची लोकसंख्या अंदाजे १० लक्ष असून पाण्याची मागणी २०७ द.ल.लि. प्रति दिन आहे. परंतु मिरा-भाईंदर शहरास स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि. कडून दररोज ८६.०० द.ल.लि. व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून सरासरी ५० द.ल.लि. असा एकुण सरासरी १३६ द.ल.लि. पाणी पुरवठा दैनंदिन होत आहे. सद्यस्थितीत होणारा पाणी पुरवठा आवश्यक असलेल्या पाणी पुरवठ्यापेक्षा ७१ द.ल.लि. कमी होत आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात तत्कालीन आयुक्त यांच्या दि.०४/१०/२०११ रोजीच्या आदेशान्वये शहरात अपुरा पाणी पुरवठा होत असल्याने नविन जलजोडणी मंजूरी देणेस स्थगिती देण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदर शहराची सद्याची पाण्याची मागणी व होणारा पाणी पुरवठा यातील तफावत तसेच सन २०२१ पर्यंतची पाण्याची मागणी पूर्ण होण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेस महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून दि. २४/११/२०१४ रोजी अतिरिक्त ७५ द.ल.ली. पाणी मंजूर करण्यात आलेले आहे.

वरील मंजूर अतिरिक्त ७५ द.ल.ली. पाणी शहरापर्यंत आणणेकरिता महाराष्ट्र शासनाच्या सुवर्ण जयंती महाअभियांनाअंतर्गत योजनेची कामे प्रगती पथावर आहेत. तसेच मंजुर ७५ द.ल.ली पाणी पुरवठया पैकी २५ द.ल.ली पाणी पुरवठा शहरास सुरु होणार आहे. त्या अनुषंगाने शहरात नविन जलजोडणी मंजुरी सुरु करणे आवश्यक आहे. नवीन जलजोडणी मंजुरी कामाबाबत नविन संगणक आज्ञावलीची आवश्यकता असुन त्यामध्ये ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने नळजोडणी अर्ज स्विकारणे, नळजोडणीस मंजुरी देणे इ. बाबी अंर्तभूत असणे आवश्यक आहे. सदर कामी निविदा काढून संगणक आज्ञावलीकरीता दर मागविणे आवश्यक आहे. सदर कामास रु.९,८०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर कामी मे. NP Infoserve Technologies Pvt Ltd यांना अनुभव असल्याने व नविन जलजोडणी मंजुरी सुरु करावयाची असल्यामुळे मे. NP Infoserve Technologies Pvt Ltd यांचेकडे काम करणेस दर मागविले असता सदर कामासाठी रु.९,८०,०००/- इतक्या रक्कमेत करणेस समर्थता दर्शविलेली आहे.

तरी वरीलप्रमाणे मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नविन जलजोडणी ऑनलाईन पद्धतीने सुरु करुन संगणक आज्ञावलीव्दारे कार्यान्वित करणे हे काम अत्यावश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची (ड) मधील प्रकरण ५(२)(२) अन्वये सदर कामासाठी रक्कम रु.९,८०,०००/-(अक्षरी नऊ लाख ऐंशी हजार मात्र) अधिक देय कर या रक्कमेस मान्यता देणे व सदरील काम मे. NP Infoserve Technologies Pvt Ltd यांचे मार्फत करुन घेण्यास ही सभा मान्यता देत आहे.

परंतु सदर नवीन नळ जोडणीसाठी सॉफ्टवेअर (Software) हे पूर्णपणे मनपा अधिकाऱ्यांसाठी व शहरातील नागरीकांसाठी नवीन असणार आहे. यावेळी मोठ्या संख्येने नवीन कनेक्शन अर्ज येणार आहे, सॉफ्टवेअर (Software) मनपाने अजून वापर केलेला नाही. यापूर्वी हाऊस टॅक्स (House Tax) कलेक्शनसाठी सॉफ्टवेअर (Software) घेतले होते. परंतु सदरचे (Software) बरोबर चालत नसल्याने मोठ्या प्रमाणात नागरीकांना व जनतेला त्रास झाला म्हणून यावेळी दि. ३० एप्रिल ते ३० जुलै पर्यंत ऑफलाईन (Offline) फॉर्म घेण्यात यावे, त्यानंतर सॉफ्टवेअरचा वापर बघून त्याचा (Online) वापर सुरु करावा.

तसेच मनपानी काही महिन्यांपूर्वी मोठ्या प्रमाणात सोसायटींचे अनधिकृत नळ कनेक्शन तोडून सोसायटीवर गुन्हे दाखल केले आहे. सदर सभा सर्व तोडलेले कनेक्शन दंडासहीत पैसे वसुल करुन नियमित करुन सुरु करावे व सोसायटीच्या जबाबदार व्यक्तीवर गुन्हे दाखल केले होते ते संबंधित पोलीस स्टेशन किंवा न्यायालयातून मागे घेण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

वर्षा भानुशाली :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

सर्वानुमते मंजूर.

प्रकरण क्र. १२ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नविन जलजोडणी मंजूरीसाठी संगणक आज्ञावली विकसित करुन कार्यान्वित करणेकामी संस्थेची नेमणूक करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड मधील प्रकरण ५(२)(२) अन्वये मान्यता देणेबाबत.

ठराव क्र. १२ :-

मिरा-भाईदर शहराची लोकसंख्या सन २०११ च्या जनगणनेनुसार ८.१४ लक्ष इतकी असून सध्याची लोकसंख्या अंदाजे १० लक्ष असून पाण्याची मागणी २०७ द.ल.लि. प्रति दिन आहे. परंतु मिरा-भाईंदर शहरास स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि. कडून दररोज ८६.०० द.ल.लि. व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून सरासरी ५० द.ल.लि. असा एकूण सरासरी १३६ द.ल.लि. पाणी पुरवठा दैनंदिन होत आहे. सद्यस्थितीत होणारा पाणी पुरवठा आवश्यक असलेल्या पाणी पुरवठ्यापेक्षा ७१ द.ल.लि. कमी होत आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात तत्कालीन आयुक्त यांच्या दि.०४/१०/२०११ रोजीच्या आदेशान्वये शहरात अपुरा पाणी पुरवठा होत असल्याने नविन जलजोडणी मंजूरी देणेस स्थगिती देण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदर शहराची सद्याची पाण्याची मागणी व होणारा पाणी पुरवठा यातील तफावत तसेच सन २०२१ पर्यंतची पाण्याची मागणी पूर्ण होण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेस महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून दि. २४/११/२०१४ रोजी अतिरिक्त ७५ द.ल.ली. पाणी मंजूर करण्यात आलेले आहे.

वरील मंजूर अतिरिक्त ७५ द.ल.ली. पाणी शहरापर्यंत आणणेकरिता महाराष्ट्र शासनाच्या सुवर्ण जयंती महाअभियांनाअंतर्गत योजनेची कामे प्रगती पथावर आहेत. तसेच मंजुर ७५ द.ल.ली पाणी पुरवठया पैकी २५ द.ल.ली पाणी पुरवठा शहरास सुरु होणार आहे. त्या अनुषंगाने शहरात नविन जलजोडणी मंजुरी सुरु करणे आवश्यक आहे. नवीन जलजोडणी मंजुरी कामाबाबत नविन संगणक आज्ञावलीची आवश्यकता असुन त्यामध्ये ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने नळजोडणी अर्ज स्विकारणे, नळजोडणीस मंजुरी देणे इ. बाबी अंर्तभूत असणे

आवश्यक आहे. सदर कामी निविदा काढून संगणक आज्ञावलीकरीता दर मागविणे आवश्यक आहे. सदर कामास रु.९,८०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर कामी मे. NP Infoserve Technologies Pvt Ltd यांना अनुभव असल्याने व नविन जलजोडणी मंजुरी सुरु करावयाची असल्यामुळे मे. NP Infoserve Technologies Pvt Ltd यांचेकडे काम करणेस दर मागविले असता सदर कामासाठी रु.९,८०,०००/- इतक्या रक्कमेत करणेस समर्थता दर्शविलेली आहे.

तरी वरीलप्रमाणे मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नविन जलजोडणी ऑनलाईन पद्धतीने सुरु करुन संगणक आज्ञावलीव्दारे कार्यान्वित करणे हे काम अत्यावश्यक असल्याने या कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची (ड) मधील प्रकरण ५(२)(२) अन्वये सदर कामासाठी रक्कम रु.९,८०,०००/-(अक्षरी नऊ लाख ऐंशी हजार मात्र) अधिक देय कर या रक्कमेस मान्यता देणे व सदरील काम मे. NP Infoserve Technologies Pvt Ltd यांचे मार्फत करुन घेण्यास ही सभा मान्यता देत आहे.

परंतु सदर नवीन नळ जोडणीसाठी सॉफ्टवेअर (Software) हे पूर्णपणे मनपा अधिकाऱ्यांसाठी व शहरातील नागरीकांसाठी नवीन असणार आहे. यावेळी मोठ्या संख्येने नवीन कनेक्शन अर्ज येणार आहे, सॉफ्टवेअर (Software) मनपाने अजून वापर केलेला नाही. यापूर्वी हाऊस टॅक्स (House Tax) कलेक्शनसाठी सॉफ्टवेअर (Software) घेतले होते. परंतु सदरचे (Software) बरोबर चालत नसल्याने मोठ्या प्रमाणात नागरीकांना व जनतेला त्रास झाला म्हणून यावेळी दि. ३० एप्रिल ते ३० जुलै पर्यंत ऑफलाईन (Offline) फॉर्म घेण्यात यावे, त्यानंतर सॉफ्टवेअरचा वापर बघून त्याचा (Online) वापर सुरु करावा.

तसेच मनपानी काही महिन्यांपूर्वी मोठ्या प्रमाणात सोसायटींचे अनधिकृत नळ कनेक्शन तोडून सोसायटीवर गुन्हे दाखल केले आहे. सदर सभा सर्व तोडलेले कनेक्शन दंडासहीत पैसे वसुल करुन नियमित करुन सुरु करावे व सोसायटीच्या जबाबदार व्यक्तीवर गुन्हे दाखल केले होते ते संबंधित पोलीस स्टेशन किंवा न्यायालयातून मागे घेण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. राकेश शहा        अनुमोदन :- श्रीम. वर्षा भानुशाली

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. सभापती :-

सभा संपली असे मी जाहिर करतो.

(सभा संपण्याची वेळ दु. ०१.३० वाजता)

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका